—: <u>प्रेस नोट :—</u>

परिमंडळ ४ अतर्गत र.अ.कि. मार्ग, पो.ठाणे, गु.र.क्र. १५६/२००३ कलम ४५७, ३८०, ३४ भादवि कोर्ट केस क्र. २६४/पीडब्लू/२००५ मधील अटक आरोपी हबीबुल भोलु इमाम बक्श शेख उर्फ भुल्लू, हा मा. १३ वे न्यायालय, शिवडी, मुंबई हा सुनावणीकामी हजर राहत नसल्याने त्याचे विरोधात मा. न्यायालयाने स्थित अजामीनपात्र वॉरंट जारी करून त्यास 'फरार' घोषित केले आहे. सदर प्रकरणी र.अ.कि. मार्ग, पो.ठाणे, पोलीस ठाणेस गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारावर, नमूद फरार आरोपी यांस मु. हरदोली, ता. बबेरू, जिल्हा बांदा, राज्य उत्तर प्रदेश येथून अटक करून मा. न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे.

तसेच, परिमंडळ ४ अतर्गत ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे नोंद गु.र.क्र. ९६/२०१२ कलम ३०७, ४५२, ३२४, ३२३, १४३, १४६, १४७, १४८, १४९ भादविसह ३७(१) १३५ मुपोकासह ४,२५ या गुन्हयातील आरोपी नामे कुप्पन मारीअप्पन देवेंद्र वय ३६ वर्षे राठी इंदिरा नगर झोपडपट्टी, रविराजा ऑफीसच्या जवळ, टाटा पावर च्या खाली, सायन कोळीवाडा, मुंबई-३७ हा सुनावणीकामी हजर राहत नसल्याने मा. अति. सत्र न्यायाधीश, ३० नंबर न्यायालय, मुंबई यांनी त्यास नमुद गुन्हयात फरार घोषीत करून त्याच्या विरूध्द स्टॅन्डींग वांरट जारी केले होते. सदर प्रकरणी ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे पोलीस ठाणेस गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीती च्या आधारावर, नमूद फरार आरोपी यांस अटक करून मा. न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. सत्यनारायण, सह पोलीस आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई, श्री. अनिल पारस्कर, अप्पर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई, श्रीमती रागसुधा आर.,पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली र.अ.कि. मार्ग, पो.ठाणे चे मपोउपनि पल्लवी जाधव व पथक, ॲन्टॉपहिल पोलीस ठाणेचे पोउनि अरफात सिध्दीकी व पथक यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner